**महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम १९६६**

कलम ११३ (२) खालील दुसऱ्या परंतुकानुसार नागरी क्षेत्राच्या प्रमाणदराच्या हमी मुदतीमध्ये वाढ करण्याबाबत तसेच सन १९९६-९७ व १९९७-९८ या महसूली वर्षाच्या अकृषिक आकारणीच्या थकबाकीच्या वसूलीबाबत.

महाराष्ट्र शासन

महसूल व वन विभाग

शासन निर्णय क्रमांक एनएए-१०९९/प्र.क्र.३५/ल-५

मंत्रालय, मुंबई-४०० ०३२

दिनांक १४ जून, १९९९

**शासन निर्णय:-**

महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम १९६६ च्या कलम ११३(१) च्या तरतुदीनुसार नागरी क्षेत्रासाठी अकृषिक आकारणीचे प्रमाणदर निश्चित करण्यात येतात. अशा प्रमाणदरांना पाच वर्षाची हमी मुदत असून, हमी मुदत संपताच प्रमाणदर व कलम ११६ नुसार अकृषिक आकारणी सुधारण्यात पात्र असते. दिनांक १.८.१९९१ ते ३१.७.१९९६ या हमी मुदतीचे प्रमाणदर निश्चितीचे प्रस्ताव शासनाकडे प्राप्त झाले होते. त्यापैकी काही नागरी क्षेत्राचे प्रमाणदर निश्चित करुन लागू करण्यात आले. तथापि, बहुतांशी नागरी क्षेत्राचे सदर हमी मुदतीचे प्रमाणदर हमी मुदतीत म्हणजेच दिनांक ३१.७.१९९६ पर्यंत सुधारीत होऊ शकलेले नाहीत, महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियमाचे कलम ११३(२ब) ची तरतूद लक्षात घेता आता अशा नागरी क्षेत्रासाठी दिनांक १.८.१९९१ ते ३१.७.१९९६ च्या हमी मुदतीचे प्रमाणदर निश्चित करता येणार नाहीत असे दिसून आले.

वरील परिस्थितीत ज्या ठिकाणी दिनांक १.८.१९९१ ते ३१.७.१९९६ या हमी मुदतीचे प्रमाणदर निश्चित झालेले नाहीत तेथे दिनांक १.८.१९९६ ते ३१.७.२००१ या हमी मुदतीचे प्रमाणदर निश्चित करावे लागतील. तथापि, ज्या ठिकाणी दिनांक १.८.१९९१ ते ३१.७.१९९६ या हमी मुदतीचे प्रमाणदर निश्चित होऊन लागू झालेले आहेत, दिनांक १.८.१९९६ ते ३१.७.२००१ या हमी मुदतीसाठी सुधारीत केल्याने ते दोनदा सुधारीत होतात त्यामुळे संबंधित खातेदारांवर अन्याय होणार आहे.

वरील वस्तुस्थिती लक्षात घेवून गेल्या अधिवेशनात महाराष्ट्र अधिनियम २३/९९ अन्वये महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम १९६६ चे कलम ११३(२) मध्ये दुरुस्ती करुन शासनाला आवश्यकता भासल्यास हमी मुदतीत पाच वर्षापर्यंत वाढ देता येईल, अशी तरतुद करण्यात आली. कलम ११३ (२) मध्ये वर नमुद दुरुस्ती नुसार समाविष्ट करण्यात आलेल्या नवीन परंतुकानुसार शासनाने आता खालील प्रमाणे निर्णय घेतला आहे.

अ) ज्या नागरी क्षेत्राचे दिनांक १.८.१९९१ ते ३१.७.१९९६ या हमी मुदतीचे प्रमाणदर सुधारीत होवून लागू झालेले आहेत. त्यांची मुदत त्यापुढील पाच वर्षाकरीता म्हणजेच दिनांक ३१.७.२००१ पर्यंत वाढविण्यात येत आहे. परिणामी त्या नागरी क्षेत्रासाठीचे प्रमाणदर व महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम १९६६ चे कलम ११६ नुसार सुधारीत केलेली अकृषिक आकारणी दिनांक ३१.७.२००१ पर्यंत लागू राहील व दिनांक १.८.२००१ पासून सुरु होणाऱ्या पुढील हमी मुदतीसाठी सुधारीत करण्यात येईल.

ब) ज्या नागरी क्षेत्राचे प्रमाणदर दिनांक १.८.१९९१ ते ३१.७.१९९६ या हमी मुदतीसाठी सुधारीत झालेले नाहीत, तेथे दिनांक १.८.१९९१ पूर्वी लागू असलेल्या प्रमाणदरांना तसेच

कलम ११६ नुसार लागू केलेल्या अकृषिक आकारणीला दिनांक १.८.१९९१ ते ३१.७.१९९६ या हमी मुदतीच्या कालावधीसाठी वाढ देण्यात येत आहे. त्यामुळे त्या नागरी क्षेत्रात दिनांक १.८.१९९१ पूर्वीचे प्रमाणदर व अकृषिक आकारणी दिनांक ३१.७.१९९६ पर्यंत लागू राहील व सदर प्रमाणदर व अकृषिक आकारणी दिनांक १.८.१९९६ पासून सुरु होणाऱ्या हमी मुदतीसाठी सुधारीत होण्यास पात्र राहील ही कार्यवाही, कायद्यात महाराष्ट्र अधिनियम २३/९९ अन्वये केलेल्या दुरुस्तीनुसार जिल्हाधिकाऱ्यांना प्रदान करण्यात आलेल्या अधिकारात करावयाची आहे. (अधिकार प्रदानाची अधिसूचना सोबत जोडण्यात येत आहे.)

क) जिल्हाधिकारी यांनी दिनांक १.८.१९९६ ते ३१.७.२००१ या हमी मुदतीसाठीचे प्रमाणदर निश्चित केल्यानंतर कलम ११६ च्या तरतुदीनुसार अकृषिक आकारणीत केलेल्या सुधारणेनुसार खातेदारांकडून वसूली योग्य होणाऱ्या १९९६-१९९७ व १९९७-९८ या महसूली वर्षाच्या थकबाकीला माफी देण्याचा शासनाने निर्णय घेतलेला आहे. त्यानुसार कार्यवाही करण्यात यावी. सुधारीत अकृषिक आकारणीनुसार करावयाची वसूली १९९८-९९ या महसूली वर्षापासून करण्यात यावी.

सर्व जिल्हाधिकारी यांना विनंती आहे की, या शासन निर्णयानुसार नागरी क्षेत्राचे अकृषिक आकारणीचे प्रमाणदर निश्चिती, अकृषिक आकारणीत सुधारणा (कलम ११६ प्रमाणे) व वसूली करण्यात यावी.

हा शासन निर्णय वित्त विभागाने त्यांच्या अनौपचारीक संदर्भ क्रमांक ५९६/९९/व्यय-९, दिनांक २९.५.१९९९ अन्वये दिलेल्या सहमतीने निर्गमित करण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने

चं. ना. दळवी

**(चंद्रकांत दळवी)**

उपसचिव

महसूल व वन विभाग

प्रत,